# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरपोरेशन मर्यादित
## (भारत सरकार व महाराष्ट्र सरकार चा संयुक्त उपक्रम)

अधीसूचना क्र. **MAHA-Metro/P/HR/AA/2023**
**दिनांक: 27.10.2023**

## अधिसूचना

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (MMRCL) मध्ये नागपूर, पुणे आणि नवी मुंबई येथे अप्रेंटिस ॲक्ट 1961 अंतर्गत शिकाऊ उमेदवारांची नाव नोंदणी.

| | |
|---|---|
| **ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख**<br>**Website- www.mahametro.org**<br>**वेबसाइट प्रविष्ट केल्यानंतर ह्या लिंकवर क्लिक करा**<br>**'ACT APPRENTICE NOTIFICATION'** | **28.10.2023 10.00 hrs.** |
| **ऑनलाइन अर्ज प्रक्रिया बंद होण्याची तारीख** | **28.11.2023 18.00 hrs.** |

134 (एकशे चौतीस) जागांसाठी महा-मेट्रो डेपो / स्टेशन्स येथे नियुक्त ट्रेड्स मध्ये अप्रेंटिस ॲक्ट 1961 (Apprentice Act 1961) अंतर्गत प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व बाबतीत पूर्ण झालेले अर्ज शेवटच्या तारखेच्या आत ऑनलाइन सबमिट केले जावेत. शेवटच्या दिवशी, 28.11.2023 रोजी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अर्ज करण्याची मुदत राहील.

1. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड साठी अप्रेंटिस ॲक्ट 1961 अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या सहभागासाठी ही केंद्रीकृत अधिसूचना आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवार त्यांचे अर्ज फक्त महा-मेट्रोच्या **www.mahametro.org** या वेबसाइटवर ऑनलाइन सबमिट करू शकतात.

2. नागपूर, पुणे आणि नवी मुंबई मेट्रोसाठी वेगवेगळया गुणवत्ता याद्या तयार केल्या जातील व त्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या नागपूर, पुणे आणि नवी-मुंबई कार्यालयांना सूचित केल्या जातील.

3. दस्तऐवज पडताळणी पुणे मेट्रो रेल ऑफिसमध्ये किंवा नंतर निर्दिष्ट केल्यानुसार इतर कोणत्याही ठिकाणी केली जाईल.

4. उमेदवारांनी लक्षात ठेवावे की कोणतीही केंद्रीकृत गुणवत्ता यादी तयार केली जाणार नाही.

5. **निवड पद्धत:**

5.1 अधिसूचनेनुसार सर्व बाबतीत पूर्ण असलेले अर्ज करणाऱ्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार केली जाईल. गुणवत्ता यादी मॅट्रिकमधील गुणांच्या टक्केवारी (किमान 50% एकूण गुणांसह) + ITI ट्रेड

ज्यामध्ये अप्रेंटिसशिप करायची आहे, त्या मधील एकूण गुणांच्या आधारे तयार केली जाईल. मॅट्रिक आणि आयटीआय मधील गुणांच्या साध्या सरासरीच्या आधारे गुणवत्तेनुसार पॅनेल काढले जाईल. स्टँड-बाय व्यवस्थेसाठी 10% उमेदवारांना प्रतीक्षा यादीत ठेवले जाईल.

मॅट्रिकची टक्केवारी काढण्यासाठी, उमेदवारांना सर्व विषयांमध्ये मिळालेल्या गुणांची गणना केली जाईल. ही टक्केवारी काढताना कोणत्याही निवडक विषयाच्या गुणांच्या आधारावर किंवा पाचपैकी सर्वोत्तम इत्यादीसारख्या विषयांच्या गटावर काढली जाणार नाही.

ITI गुणांची टक्केवारी काढताना, NCVT/SCVT द्वारे जारी केलेल्या तात्पुरत्या नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या संबंधित ट्रेडच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या एकत्रित गुणांची सरासरी केली जाईल.

5.2 दोन उमेदवारांना समान गुण असल्यास, अधिक वय असलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल. जर जन्मतारीखही सारखीच असेल, तर आधी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराचा प्रथम विचार केला जाईल.

5.3 वर म्हटल्याप्रमाणे, उमेदवाराने मिळवलेल्या गुणांच्या टक्केवारीच्या उतरत्या क्रमाने स्लॉटच्या संख्येएवढी अंतिम गुणवत्ता यादी युनिटनुसार, ट्रेडनुसार आणि समुदायानुसार तयार केली जाईल.

5.4 अंतिम गुणवत्ता यादी मध्ये समाविष्ट झालेला उमेदवार अपलोड केलेल्या मूळ मार्क-लिस्ट व प्रशस्तिपत्रांची पडताळणी आणि संलग्न परिशिष्टानुसार वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्राच्या प्रस्तुतीच्या अधीन असेल.

6. ऑनलाइन अर्ज सादर करताना, प्रत्येक अर्जदाराला एक नोंदणी क्रमांक जारी केला जाईल. महा-मेट्रोशी संलग्नता प्रक्रियेच्या पुढील टप्प्यांसाठी / पत्रव्यवहारासाठी उमेदवारांना त्यांचा नोंदणी क्रमांक जतन / नोंद करून ठेवण्याचा सल्ला दिला जात आहे.

टीप I: शेवटच्या क्षणी गर्दी टाळण्यासाठी, इंटरनेटवरील जास्त लोडमुळे किंवा महा मेट्रोच्या वेबसाइटवर लॉगइन करण्यात संभाव्य अक्षमता / अपयश टाळण्यासाठी किंवा शेवटच्या दिवसात वेबसाइट ठप्प होणे अश्या संभाव्य अडचणींचा विचार करता उमेदवारांना त्यांच्या स्वत:च्या हितासाठी सल्ला दिला जातो की त्यांनी शेवटच्या तारखेच्या खूप आधी ऑनलाइन अर्ज सबमिट करावा.

टीप II: उपरोक्त कारणांमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे उमेदवार शेवटच्या दिवशी अर्ज सादर करू शकला नाही तर त्या बाबत कोणतीही जबाबदारी महा-मेट्रो स्वीकारणार नाही.

7. **उमेदवारांना नागपूर, पुणे किंवा नवी मुंबई यापैकी एकच युनिट निवडायचे आहे.**

8. **खालील ट्रेड मध्ये शिकाऊ उमेदवारांची नोंदणी केली जाईल:**

महा-मेट्रो मधील ट्रेड अप्रेंटिसची संबंधित युनिट्स (नागपूर/पुणे/नवी मुंबई) आणि विभागामध्ये प्रस्तावित नोंदणी खाली नमूद केली आहे:

| **नागपूर** | **Total** | | SC | ST | OBC | EWS | UR | | EX | PH | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | OH | HH |
| इलेक्ट्रिशियन | **24** | | 3 | 1 | 6 | 2 | 12 | | 2 | 1 | 1 |
| इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | **17** | | 2 | 1 | 4 | 1 | 9 | | 1 | | |
| फिटर | **25** | | 3 | 1 | 6 | 2 | 13 | | 2 | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लिफ्ट व एस्कलेटर मेकॅनिक | **3** | | 0 | 0 | 0 | 0 | 3 | | 0 | | |
| मेकॅनिक (फ्रीज व ए/सी) | **2** | | 0 | 0 | 0 | 0 | 2 | | 0 | | |
| | **71** | | | | | | | | | | |

| **पुणे** | **Total** | | SC | ST | OBC | EWS | UR | | EX | PH | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | OH | HH |
| इलेक्ट्रिशियन | **18** | | 2 | 1 | 4 | 1 | 10 | | 1 | 1 | 1 |
| इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | **13** | | 1 | 0 | 3 | 1 | 8 | | 1 | | |
| फिटर | **17** | | 2 | 1 | 4 | 1 | 9 | | 1 | | |
| लिफ्ट व एस्कलेटर मेकॅनिक | **3** | | 0 | 0 | 0 | 0 | 3 | | 0 | | |
| मेकॅनिक (फ्रीज व ए/सी) | **2** | | 0 | 0 | 0 | 0 | 2 | | 0 | | |
| | **53** | | | | | | | | | | |

| **नवी मुंबई** | **Total** | | SC | ST | OBC | EWS | UR | | EX | PH | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | OH | HH |
| इलेक्ट्रिशियन | **3** | | 0 | 0 | 0 | 0 | 3 | | 0 | 0 | 0 |
| इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | **2** | | 0 | 0 | 0 | 0 | 2 | | 0 | | |
| फिटर | **3** | | 0 | 0 | 0 | 0 | 3 | | 0 | | |
| लिफ्ट व एस्कलेटर मेकॅनिक | **1** | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | | 0 | | |
| मेकॅनिक (फ्रीज व ए/सी) | **1** | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | | 0 | | |
| | **10** | | | | | | | | | | |

टीप: 'PwBD' म्हणजे अपंग व्यक्ती आणि 'Ex' म्हणजे माजी सैनिक. वरील तक्त्यातील PwBD आणि माजी सैनिकांच्या जागा वेगळ्या नाहीत, परंतु एकूण जागांच्या संख्येमध्ये समाविष्ट आहेत. या अधिसूचनेमध्ये दर्शविलेल्या प्रशिक्षण जागांची संख्या तात्पुरती आहे आणि निवड अंतिम करण्याच्या वेळी प्रशासनाच्या वास्तविक गरजांवर अवलंबून संख्या जास्त किंवा कमी करण्यात येऊ शकते.

टीप: कृपया तुमच्या ITI ट्रेडच्या संदर्भात वर दिलेले उपलब्ध प्रशिक्षण स्लॉट बघा आणि त्यानुसार युनिट निवडा. तुमच्या ITI ट्रेडनुसार ट्रेनिंग स्लॉटची आवश्यकता नसलेले युनिट तुम्ही निवडले आहे असे होऊ नये. अशा परिस्थितीत तुमचा अर्ज अखेरीस निरर्थक होऊ शकतो, कारण तुम्हाला अंतिम सबमिशन केल्यानंतर कोणतेही बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. शिवाय, तुम्हाला नंतर दुसरा अर्ज किंवा अनेक अर्ज करण्याची परवानगी दिली जाणार नाही व अशा परिस्थितीत तुमचे सर्व अर्ज सरसकट नाकारले जातील.

जेव्हा अनुसूचित जातीच्या व्यक्तींची विहित संख्या उपलब्ध नसेल, तेव्हा ती अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून भरली जाईल. अनुसूचित जमातीच्या स्लॉटसाठी, अनुसूचित जमातीचा उमेदवार उपलब्ध नसल्यास, ते अनुसूचित जातीच्या उमेदवारांद्वारे भरले जातील. अनुसूचित जाती/जमाती उमेदवारांसाठी विहित प्रशिक्षण स्लॉट वरील पद्धतीने भरले जाऊ शकत नसल्यास, असे न भरलेले प्रशिक्षण स्लॉट अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या नसलेल्या व्यक्तींद्वारे भरले जातील, म्हणजे अनारक्षित उमेदवार. त्याचप्रमाणे ओबीसी/ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) उमेदवारांनी न भरलेल्या जागा अनारक्षित प्रवर्गातील उमेदवारांकडून भरल्या जातील.

9. **पात्रतेच्या अटी:**

9.1 अधिसूचनेच्या तारखेला उमेदवारांचे वय 17 वर्षे पूर्ण झालेले असावे आणि 24 वर्षा पेक्षा जास्त नसावे.

9.2 उच्च वयोमर्यादा SC/ST उमेदवारांच्या बाबतीत 05 वर्षे आणि OBC उमेदवारांच्या बाबतीत 3 वर्षे शिथिल आहे. त्यानुसार, विविध समुदायांसाठी, पात्र जन्मतारीख श्रेणी खालीलप्रमाणे असेल:

| समुदाय | उमेदवार खालील तारखांच्या मध्ये जन्मलेला असाला पाहिजे |
|---|---|
| UR | 27.10.1999 to 26.10.2006 |
| SC | 27.10.1994 to 26.10.2006 |
| ST | 27.10.1994 to 26.10.2006 |
| OBC | 27.10.1996 to 26.10.2006 |

9.3 माजी सैनिक जे सरकारी नोकरी मध्ये सामील झाले आहेत अथवा माजी सैनिक पदाचा लाभ घेतल्यानंतर त्यांनी व्यस्ततेच्या उद्देशाने नागरी सेवा केली आहे असे सोडून इतर माजी सैनिकांनी कमीत कमी सहा महीने संरक्षण सेवा दला मध्ये सेवा दिलेली असेल तर त्यांना उच्च वयोमर्यादा अतिरिक्त 10 वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येऊ शकते म्हणजे संरक्षण सेवा दलांमध्ये प्रदान केलेल्या सेवेच्या मर्यादेपर्यंत अधिक 03 वर्षांपर्यंत. तथापि, माजी सैनिक उपलब्ध असल्यास समुदायाचा (SC/ST/OBC) विचार न करता, माजी सैनिक कोट्या अंतर्गत त्यांचा विचार केला जाईल. जर अनारक्षित (UR) रिक्त पदे उपलब्ध नसतील, तर केवळ त्या विशिष्ट समुदायातील माजी सैनिकांनाच माजी सैनिक कोट्या अंतर्गत विचारात घेतले जाईल. माजी सैनिकांची विहित संख्या उपलब्ध नसल्यास, ती इतर योग्य उमेदवारांकडून भरली जाईल.

9.4 ज्या उमेदवारांना अनुसूचित जाती / जमातीच्या आरक्षणाचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी ऑनलाइन अर्जाच्या वेळी योग्य प्राधिकाऱ्याने जारी केलेले त्यांचे जात प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, ज्या उमेदवारांना OBC आरक्षणाचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी ऑनलाइन अर्जाच्या वेळी योग्य प्राधिकाऱ्याने 01.04.2023 रोजी किंवा त्यानंतर जारी केलेले प्रमाणपत्र आणि नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराला आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच दस्तऐवज पडताळणीच्या वेळी मूळ स्वरूपात ही प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

9.5 ज्या उमेदवारांना माजी सैनिक आणि सशस्त्र सेवा दलातील कर्मचाऱ्यांच्या आरक्षणाचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी ऑनलाइन अर्जाच्या वेळी अनुक्रमे डिस्चार्ज प्रमाणपत्र अथवा सशस्त्र सेवा दल प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे आणि माजी सैनिक आणि सशस्त्र सेवा दलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या बाबतीत, त्यांनी त्याच्या / तिच्या पालकांचे डिस्चार्ज प्रमाणपत्र किंवा सशस्त्र सेवा दल प्रमाणपत्र (संबंधित) अपलोड करणे आवश्यक आहे.

10. **माजी सैनिक**

10.1 त्यांच्यासाठी प्रदान केलेल्या आरक्षणांतर्गत निवडलेल्या माजी सैनिक उमेदवाराला योग्य श्रेणीमध्ये ठेवायचे आहे उदा. UR/SC/ST/OBC पैकी ज्या श्रेणीचा तो आहे. माजी सैनिक, त्यांची मुले आणि सशस्त्र सेवा दलातील कर्मचाऱ्यांची मुले खाली नमूद केलेल्या तपशिलानुसार शिकाऊ उमेदवारीसाठी घेतली जातील:

a) शांततेच्या काळात मृत/अपंग झालेल्या माजी सैनिकांची मुले.
b) माजी सैनिकांची मुले.
c) सेवा करणाऱ्या जवानांची मुले

d) सर्व्हिंग ऑफिसरची मुले
e) माजी सैनिक

11. **किमान शैक्षणिक पात्रता:**

उमेदवाराने मान्यताप्राप्त मंडळाकडून दहावी परीक्षा किंवा त्याच्या समकक्ष परीक्षा (10+2 परीक्षा प्रणाली अंतर्गत) किमान 50% गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे तसेच राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण परिषदेने जारी केलेल्या अधिसूचित ट्रेडमध्ये नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे किंवा नॅशनल कौन्सिल फॉर व्होकेशनल ट्रेनिंग / स्टेट कौन्सिल फॉर व्होकेशनल ने जारी केलेले तात्पुरते प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

12. **फी भरणे**

12.1 अर्ज फी (परतावा न करण्यायोग्य) – **रु.100/-** अधिक प्रक्रिया शुल्क (परतावा न करण्यायोग्य) – **रु.50/-.** अनुसूचित जाती / जमाती / अपंग तसेच महिला उमेदवारांना कोणतेही अर्ज शुल्क भरावे लागणार नाही. मात्र, त्यांना पन्नास रुपये **(रु.50/-)** प्रक्रिया शुल्क भरावे लागणार आहे.

12.2 ऑनलाइन अर्ज प्रक्रियेचा भाग म्हणून पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाइन फी भरावी लागेल:

- www.mahametro.org या वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज सर्व बाबतीत पूर्ण झाल्यानंतर, उमेदवारांना पेमेंट करण्यासाठी बँकेच्या वेबसाइटच्या पेमेंट गेटवेवर निर्देशित केले जाईल.
- एकदा पेमेंट प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर, उमेदवारांना अर्ज डाउनलोड करण्यासाठी पुनर्निर्देशित केले जाईल.
- जर उमेदवारांनी आधी पेमेंट करण्याचा प्रयत्न केला असेल आणि इंटरनेट कनेक्शनच्या काही समस्या आल्या असतील ज्यामुळे त्यांच्या खात्यातून फीची रक्कम कापली गेली आहे परंतु तरीही ते अर्ज डाउनलोड करू शकत नाहीत तर पेमेंट गेटवे वरून पुन्हा पुष्टी करण्यासाठी कृपया 'पेमेंट सत्यापित करा' (Verify Payment) बटणावर क्लिक करा.

12.3 अर्जाच्या तपशिलांच्या अचूकतेची खात्री केल्यानंतर, उमेदवारांनी ऑनलाइन अर्जासह जोडलेल्या पेमेंट गेटवेद्वारे शुल्क भरणे आवश्यक आहे. त्यानंतर कोणताही बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

12.4 स्क्रीनवर विचारल्याप्रमाणे माहिती देऊन डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड / इंटरनेट बँकिंग / UPI वापरून पेमेंट केले जाऊ शकते. ऑनलाइन पेमेंटसाठीचे तुम्ही निवडलेल्या बँके चे जर अतिरिक्त काही व्यवहार शुल्क असेल तर ते उमेदवारानेच द्यावे लागेल.

12.5 व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, उमेदवाराने प्रविष्ट केलेल्या तारखेसह ई-पावती तयार केली जाईल, जी उमेदवाराने प्रिंट करून ठेवली पाहिजे.

12.6 ऑनलाइन व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण न झाल्यास, कृपया पुन्हा लॉग इन करा आणि ऑनलाइन पेमेंट करा.

12.7 SC/ST/PWD/महिला उमेदवारांना कोणतेही अर्ज शुल्क भरावे लागणार नाही. मात्र, त्यांना पन्नास रुपये प्रक्रिया शुल्क भरावे लागणार आहे.

13. अपंग व्यक्तीसाठी फिटनेसचे मानके:

केवळ लोको मोटर किंवा सेरेब्रल पाल्सी (OH) ज्यांना संबंधित अपंगत्वाच्या 40% पेक्षा कमी नाही आणि कानात 60 डेसिबल किंवा त्याहून अधिक फ्रिक्वेन्सी असलेल्या संभाषणात्मक श्रेणीतील श्रवण अपंग (HH) आहेत ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

लोको मोटर किंवा सेरेब्रल पाल्सी (OH) साठी

| ट्रेड | स्वीकार्य अपंगत्वाचा तपशील |
|---|---|
| इलेक्ट्रिशियन | शरीराच्या खालच्या भागाचा अवयव अंशतः बाधित असलेले उमेदवार सामावून घेतले जाऊ शकतात |
| फिटर | शरीराच्या खालच्या भागाचा अवयव एका बाजूने अंशतः खराब असलेले उमेदवार सामावून घेतले जाऊ शकतात |
| इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | एक किंवा दोन्ही पाय नसलेले उमेदवार सामावून घेतले जाऊ शकतात |

अपंग व्यक्ती (PwBD) ज्याला आरक्षणाचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी सक्षम प्राधिकारी यांच्या द्वारे जारी केलेले अपंगत्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे (म्हणजेच अपंगत्वाचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट क्षेत्रातील एका तज्ञासह केंद्र किंवा राज्य सरकारने रीतसर स्थापन केलेले वैद्यकीय मंडळ). अपंगत्व प्रमाणपत्र जोडलेल्या परिशिष्ट- I/II/III नुसार काटेकोरपणे असावे.

वर नमूद केलेल्या अपंग (PwBD) व्यक्तींव्यतिरिक्त अन्य उमेदवारांनी PwBD म्हणून अर्ज करू नये आणि ते अशा सवलती/सुविधांसाठी पात्र असणार नाहीत.

14. **अर्ज कसा करावा**

14.1 उमेदवारांनी **www.mahametro.org** वर भेट देऊन ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी तपशीलवार सूचना वेबसाइटवर उपलब्ध असतील.

14.2 उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी प्रदान केलेल्या **www.mahametro.org** या वेबसाइटवर लॉग-इन करणे आवश्यक आहे आणि वैयक्तिक तपशील / बायोडेटा इत्यादी काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.

टीप I: उमेदवारांकडे स्वतःचे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. नोंदणीच्या वेळी, उमेदवारांना 12 अंकी आधार कार्ड क्रमांक भरावा लागेल. ज्या उमेदवारांकडे आधार क्रमांक नाही आणि त्यांनी आधारसाठी नावनोंदणी केली आहे परंतु त्यांना आधार कार्ड मिळालेले नाही ते आधार नोंदणी स्लिपवर छापलेला 28 अंकी आधार नोंदणी आयडी प्रविष्ट करू शकतात. दस्तऐवज पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी मूळ आधार कार्ड किंवा वर नमूद केलेला कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे.

टीप II: उमेदवारांनी त्यांचे नाव, वडिलांचे नाव, जन्मतारीख ह्या सर्व बाबी मॅट्रिक किंवा समकक्ष प्रमाणपत्र तसेच आधार कार्डमध्ये नोंदवलेल्या माहितीशी जुळत असल्याची खात्री करावी. कागदपत्र पडताळणी दरम्यान कोणताही फरक अथवा बदल आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.

टीप III: उमेदवारांना त्यांचा सक्रिय मोबाइल नंबर आणि वैध ई-मेल आयडी ऑनलाइन अर्जात सूचित करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि संपूर्ण प्रतिबद्धता (एंगेजमेंट) प्रक्रियेदरम्यान त्यांना सक्रिय ठेवावे कारण सर्व महत्त्वाचे संदेश ईमेल / एसएमएसद्वारे पाठवले जातील व उमेदवारांनी ते वाचले आहेत असे मानले जाईल.

14.3 उमेदवारांना फक्त एक युनिट निवडायचे आहे.

14.4 वेगळे नाव / वडिलांचे नाव / समुदाय / फोटो (चेहरा) / शैक्षणिक आणि किंवा तांत्रिक पात्रता इत्यादी किंवा भिन्न ईमेल आयडी / मोबाइल नंबरसह एकापेक्षा जास्त अर्ज सादर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांना सूचित केले जाते की असे सर्व अर्ज सरसकट नाकारले जातील.

14.5 उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जाच्या प्रिंटआउट ठेवाव्यात. पात्र आढळल्यास, त्यांना दस्तऐवज पडताळणीसाठी बोलावले जाईल आणि दस्तऐवज पडताळणीच्या वेळी ऑनलाइन अर्जाची प्रिंट आउट सादर करणे आवश्यक आहे.

15. **स्कॅन केलेला फोटो / फोटोग्राफची सॉफ्ट कॉपी**

15.1 उमेदवारांनी त्यांचा रंगीत फोटो (आकार 3.5cm x 3.5cm) अपलोड करणे आवश्यक आहे, फोटो JPG/JPEG फॉरमॅट मधे, 100 DPI, फाईलचा आकार 20 KB ते 70 KB च्या दरम्यान असावा, हा फोटो अर्ज करत असल्याच्या तारखेपासून मागील तीन महिन्यांच्या आत काढलेला असावा. उमेदवाराचा फोटो कॅप किंवा सनग्लासेस शिवाय, उमेदवाराचा संपूर्ण चेहरा स्पष्ट दिसेल असा असावा. उमेदवारांनी लक्षात ठेवावे की जुने / अस्पष्ट फोटो अपलोड केले असल्यास किंवा अर्जामध्ये अपलोड केलेला फोटो आणि उमेदवाराचे वास्तविक स्वरूप यामधील कोणताही ठळक फरक आढळल्यास MMRCL कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारू शकते. उमेदवारांना दस्तऐवज पडताळणीच्या वेळी आणण्यासाठी त्याच फोटोच्या दोन अतिरिक्त प्रती त्यांच्यासोबत तयार ठेवण्याचा सल्ला दिला जातो.

16. **स्कॅन केलेली स्वाक्षरी / स्वाक्षरीच्या प्रतिमेची सॉफ्ट कॉपी**

उमेदवारांनी त्यांची स्वाक्षरी देखील अपलोड करणे आवश्यक आहे (आकार 3.5cm x 3.5cm, JPG/JPEG स्वरूप, 100 DPI, फाइलचा आकार 20 KB ते 30 KB दरम्यान असावा).

17. **अपलोड करायची कागदपत्रे**

उमेदवारांनी खालील कागदपत्रांची सुवाच्य स्कॅन केलेली pdf प्रत अपलोड करणे आवश्यक आहे:

17.1 SSC (इयत्ता 10वी) किंवा त्याच्या समकक्ष गुणपत्रिका.

17.2 जन्मतारखेच्या पुराव्यासाठी प्रमाणपत्र (इयत्ता 10 वी किंवा त्याच्या समकक्ष प्रमाणपत्र किंवा जन्मतारीख दर्शविणारी गुणपत्रिका किंवा जन्मतारीख दर्शविणारा शाळा सोडल्याचा दाखला).

17.3 ज्या ट्रेड साठी अर्ज केला आहे त्या ट्रेडची सर्व सेमिस्टरची गुण दर्शविणारी एकत्रित गुणपत्रिका किंवा गुण दर्शविणारे तात्पुरते नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट.

17.4 NCVT द्वारे जारी केलेले नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट किंवा NCVT/SCVT द्वारे जारी केलेले तात्पुरते नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट.

17.5 जेथे लागू असेल तेथे वरील परिच्छेद ९.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांचे अनुसूचित जाती/जमाती/ओबीसी प्रमाणपत्र/ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र .

17.6 PwBD उमेदवाराच्या बाबतीत अपंगत्व प्रमाणपत्र.

17.7 माजी सैनिक कोट्यावर अर्ज केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत डिस्चार्ज सर्टिफिकेट / सर्व्हिंग सर्टिफिकेट.

वर म्हटल्याप्रमाणे, दस्तऐवज पडताळणीच्या दिवशी मूळ दस्तऐवज प्रस्तुत करणे अनिवार्य आहे, त्याशिवाय त्यांची दस्तऐवज पडताळणी केली जाणार नाही. इंग्रजी किंवा हिंदी किंवा मराठी व्यतिरिक्त इतर भाषांमधील प्रमाणपत्रे इंग्रजी / हिंदीमध्ये प्रमाणित भाषांतरासह असावीत.

17.8 उमेदवारांनी सर्व कागदपत्रे योग्य फॉरमॅट मधे अपलोड केल्याची खात्री करणे आवश्यक आहे. दस्तऐवज पडताळणी दरम्यान अपलोड केलेले दस्तऐवज योग्य स्वरूपातील नसून ते दुसऱ्याच स्वरूपात असल्याचे निदर्शनास आल्यास, या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार/तक्रार विचारात घेतली जाणार नाही आणि अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. याबाबत MMRCL चा निर्णय अंतिम असेल.

18. अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख

18.1 ऑनलाइन अर्ज, ऑनलाइन प्रक्रियेद्वारे महा-मेट्रोला **28.11.2023** च्या **18.00** वाजेपर्यंत सबमिट केले जाऊ शकतात. अर्जाची कोणतीही भौतिक प्रत (hard copy) महा-मेट्रोला पाठवण्याची आवश्यकता नाही. ती मिळाली तरी त्याची दखल घेतली जाणार नाही.

19. प्रशिक्षण कालावधी आणि स्टायपेंडचा दर

19.1 प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा असेल. अधिनियम प्रशिक्षणार्थी यांना MSDE-5/01/2018-AP(PMU) दिनांक 15.11.2019 आणि MSDE-5/01/2022-AP (E-55199) दिनांक 25.08.2023 च्या राजपत्रानुसार स्टायपेंड दिला जाईल:

| 1. | राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्र धारक | रु. 8050/- दरमहा |
|---|---|---|

टीप: राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्र धारकाच्या बाबतीत, राष्ट्रीय परिषद किंवा राज्य परिषदेद्वारे मान्यताप्राप्त शाळा किंवा इतर संस्थेमध्ये त्याने किंवा तिच्याद्वारे आधीच घेतलेला प्रशिक्षण कालावधी, किमान देय निश्चित करण्याच्या उद्देशाने विचारात घेतला जाईल.

19.2 निवडलेल्या उमेदवारांना MMRCL द्वारे वसतिगृहात राहण्याची कोणतीही सोय केली जाणार नाही आणि त्यांच्या प्रशिक्षणादरम्यान त्यांना शिकाऊ कायदा 1961 नुसार स्वतःची व्यवस्था करावी लागेल.

20. **प्रशिक्षणाचा करार**

20.1 नियुक्त केलेल्या ट्रेडमध्ये शिकाऊ प्रशिक्षण सुरू करण्यापूर्वी, निवडलेल्या उमेदवाराला खालील तरतुदींसह अप्रेंटिसशिपचा प्रशिक्षणाचा करार करावा लागेल.

20.2 जिथे नियोक्त्याने कराराच्या अटी आणि शर्ती पूर्ण करण्यात अपयशी झाल्यामुळे शिकाऊ उमेदवाराचा करार संपुष्टात आणला जात असेल (ॲप्रेंटिसशिप नियम 1992 अंतर्गत अधिसूचित केल्यानुसार), त्या प्रसंगी उमेदवाराला विहित केल्यानुसार अप्रेंटिस भरपाई दिली जाईल.

20.3 प्रशिक्षणार्थी कडून कराराच्या अटी व शर्ती पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यामुळे अप्रेंटिसशिपचा करार अकाली संपुष्टात आल्यास (अप्रेंटिसशिप नियम 1992 अंतर्गत अधिसूचित केल्याप्रमाणे), उमेदवार/जामीन व्यक्तीला प्रशिक्षणार्थी सल्लागाराद्वारे निश्चित केलेली रक्कम प्रशिक्षणाच्या खर्चाची भरपाई म्हणून भरावी लागेल.

20.4 नियोक्त्याने उत्तीर्ण झालेल्या ट्रेड अप्रेंटिसला त्याच्या आस्थापनेमध्ये शिकाऊ प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यावर कोणताही रोजगार देणे बंधनकारक नाही किंवा नोकरी स्वीकारणे शिकाऊ व्यक्तीवर बंधनकारक असणार नाही.

20.5 जर निवडलेला उमेदवार अल्पवयीन असेल तर, त्याच्या / तिच्या पालकाने नियोक्त्याशी प्रशिक्षणार्थी करार केला पाहिजे.

21. **वैद्यकीय फिटनेस:**

21.1 ट्रेड अप्रेंटिस म्हणून नावनोंदणी विशिष्ट ट्रेडसाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय तंदुरुस्तीच्या अधीन आहे. उमेदवाराने दस्तऐवज पडताळणीच्या वेळी अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्ट III नुसार वैद्यकीय प्रमाणपत्र आणावे लागेल. वैद्यकीय प्रमाणपत्रावर सरकारी अधिकृत (सहाय्यक पदाच्या खाली नसलेल्या) राजपत्रित डॉक्टरची स्वाक्षरी असावी म्हणजेच केंद्रीय / राज्य रुग्णालयाचे सर्जन. वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय, वर नमूद केल्याप्रमाणे, कागदपत्रांची पडताळणी केली जाणार नाही आणि उमेदवारी रद्द केली जाईल.

22. हेल्प डेस्क

22.1 अर्ज ऑनलाइन सबमिशन आणि प्रिंटिंगमधील कोणत्याही समस्यांसाठी, **support.recruitment@mahametro.org** वर ईमेल करा

23. **महत्त्वाच्या सूचना :**

23.1 पात्रता, अर्ज स्वीकारणे किंवा नाकारणे आणि निवडीची पद्धत या सर्व बाबतीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचा निर्णय अंतिम असेल.

23.2 महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये नोकरी मिळण्याचा कोणताही अधिकार असणार

नाही. 15.07.1992 रोजी कामगार मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या शिकाऊ उमेदवारी नियम, 1991 च्या अनुसूची V च्या परिच्छेद 10 च्या अटींनुसार, नियोक्त्याकडून शिकाऊ व्यक्तीला त्याचा कालावधी पूर्ण झाल्यावर कोणतीही नोकरी ऑफर करणे बंधनकारक असणार नाही. तसेच प्रशिक्षण घेतल्यावर नियोक्त्याच्या अंतर्गत नोकरी स्वीकारणे शिकाऊ व्यक्तीवर बंधनकारक असणार नाही. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर, केवळ प्रशिक्षण घेतले आहे या कारणासतो उमेदवारांना महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये सहभागी होण्याचा कोणताही अधिकार मिळणार नाही.

23.3 प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी संदर्भात उमेदवारा द्वारे केलेल्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

23.4 **कोणत्याही स्वरूपात वशिला लावण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवार अपात्र ठरेल आणि या प्रकरणात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

23.5 अर्ज करण्यापूर्वी, उमेदवारांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की ते पात्रता आणि इतर निकष पूर्ण करतात. चुकीची माहिती अथवा फसवणूक करून निवड झाल्यास, अशा उमेदवारांना कोणत्याही टप्प्यावर सूचना न देता सरसकट बरखास्त केले जाईल.

23.6 उमेदवार जर उमेदवारी पडताळणीसाठी आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करण्यात अपयशी ठरल्यास किंवा इतर कोणतीही तफावत आढळल्यास त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.

23.7 महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड च्या प्रशासना द्वारे निवड न झालेल्या किंवा बोलावलेले नाही अशा उमेदवारांना उत्तर पाठवण्याची कोणतीही जबाबदारी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड घेणार नाही. सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेने केलेला कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयाकडून विचारात घेतला जाणार नाही किंवा त्याला उत्तर दिले जाणार नाही.

23.8 मुद्रणातील कोणत्याही त्रुटीसाठी महामेट्रो प्रशासन जबाबदार राहणार नाही.

23.9 कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविलेल्या उमेदवारांना कोणताही दैनिक भत्ता/वाहतूक भत्ता किंवा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

23.10 उमेदवारांनी कोणत्याही अर्जाची प्रिंटआउट किंवा प्रमाणपत्रे किंवा प्रती महा-मेट्रोला पोस्टाने पाठवण्याची गरज नाही. ऑनलाइन अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारावरच उमेदवारांच्या उमेदवारीचा विचार केला जाईल.

23.11 एकदा एका युनिट साठी निवड झाल्यानंतर, उमेदवाराने युनिट बदलण्याची विनंती केल्यास ती मान्य केली जाणार नाही.

- महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे

**Form-I**

**Disability Certificate**

**(In cases of amputation or complete permanent paralysis of limbs and in cases of blindness)**

**(See rule 4)**

**(NAME AND ADDRESS OF THE MEDICAL AUTHORITY ISSUING THE CERTIFICATE)**

Recent PP size attested photograph (showing face only) on the person with disability

Certificate No: Date: / /

This is to certify that I have carefully examined

Shri/Smt./Kum_______________________________________________S on/wife/daughter of Shri. ________________________________

Date of Birth _____________ Age______ years, male/female _______________
(DD / MM / YY)

Registration No.________________ permanent resident of House No.
Ward/Village/__________________Street________________________
Post Office_____________District__________
State____________________________
whose photograph is affixed above, and am satisfied that:

(A) He/she is a case of:
  Locomotor disability
  Blindness
  (Please tick as applicable)

(B) The diagnosis in his/her case is ..................

(A) He/she has .............. % (in figure)..................................percent (in words) permanent physical impairment/blindness in relation to his/her............... (part of body) as per guidelines (to be specified).

2. The applicant has submitted the following documents as proof of residence: -

| Nate of Documents | Date of Issue | Details of Authority issuing certificate |
|---|---|---|
| | | |

3. Signature and seal of the Medical Authority.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name and seal of member | Name and seal of member | Name and seal of member |

Signature/Thumb impression of the person in whose favour disability certificate is issued

Chairperson
(Signature and Seal of Authorized Signatory of certified Medical Authority)

**Form-II**
**Disability Certificate**
**(In cases of multiple disabilities)**
**(NAME AND ADDRESS OF THE MEDICAL AUTHORITY ISSUING THE CERTIFICATE) (See rule 4)**

Recent PP size Attested photograph (showing face only) on the person with disability

महा मेट्रो

Certificate No. Date: / /

This is to certify that we have carefully examined Shri/Smt./Kum_________________________ son/wife/daughter of Shri __________________________________Date of Birth ________________________ (DD / MM / YY)
Age_______ years, male/female _______________

NAGPUR METRO

Registration No._____________________ permanent resident of House No.____________________________
Ward/Village/_____________________________
Street_____________________________________________
Post Office_________________________________ District__________________
State_________________________
whose photograph is affixed above, and are satisfied that:

महा मेट्रो

(A) He/she is a Case of **Multiple Disability**. His/her extent of permanent physical Impairment/disability has been evaluated as per guidelines (to be Specified) for the disabilities ticked below, and shown against the relevant disability in the table below:

| S.No | Disability | Affected part of Body | Diagnosis | Permanent physical impairment/mental disability (in %) |
|---|---|---|---|---|
| 1 | Locomotor disability | @ | | |
| 2 | Low vision | # | | |
| 3 | Blindness | Both Eyes | | |
| 4 | Hearing impairment | $ | | |
| 5 | Mental retardation | X | | |
| 6 | Mental-illness | X | | |

PUNE METRO

(B) In the light of the above, his/her over all permanent physical impairment as per guidelines (to be specified), is as follows: -
In figures: -_______________ percent.
In words: -_________________________________________ percent.

2. This condition is progressive/non-progressive/likely to improve/ not likely to improve.
3. Reassessment of disability is:
(i) not necessary,
**or**
(ii) is recommended / after _____ years _______ months, and therefore this certificate shall be valid till ______ ______ ______
(DD) (MM) (YY)

@ e.g. Left/Right/both arms/legs
# e.g. Single eye/both eyes.
$ e.g.: Left/Right/both ears.

4. The applicant has submitted following document as proof of residence: -

| Nature of Document | Date of issue | Details of authority issuing certificate. |
|---|---|---|
| | | |

5. Signature and seal of the Medical Authority.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name and seal of Member | Name and seal of Member | Name and seal of Member<br>Chairperson |

Signature/Thumb impression of the person in whose favour disability certificate is issued

परिशिष्ट -III

**SCHEDULE-II (See rule 4 of Apprenticeship Rules 1992)**
**Medical Fitness Certificate for Standard of physical fitness for engagement as Act Apprentice over Maharashtra Metro Rail Corporation Ltd**

Name of the Candidate : ..............................................................
Father's name : ..............................................................
Category : ..............................................................
Date of Birth / Age : ..............................................................
Trade & Name : ..............................................................

Permanent marks of identification 1. ..............................................................
2. ..............................................................

Paste here recent passport size photo as uploaded in online application form

Photo to be attested by Medical Officer

| S.No. | Standard of physical fitness | Observations of Medical Officer |
|---|---|---|
| 1. | A candidate should be free evidence of any contagious or infectious disease. He should not be suffering from any disease which is likely to be aggravated by service or is likely to render him unfit for service or endanger the health of the public. He should also be free from evidence of tuberculosis in any form, active or healed. | |
| 2. | **Height, Weight and Chest**<br>Candidates should satisfy the following minimum standards, namely:-<br>HEIGHT: 137 centimetres; Weight:25.4 Kilogram; Chest expansion should not be less than 3.8 centimetres irrespective of size of chest:<br>Provided that where a candidate does not satisfy the said minimum standards but is certified in writing by a Medical Officer not below the rank of an Assistant Surgeon (Gazetted), to be physically fit for being engaged as an apprentice in a particular trade under the Apprentices Act,1961, he may be engaged as an apprentice in that trade. | |
| 3. | **EYES**<br>There should be no evidence of any morbid condition of either eye of the lids of either eye which may be liable to risk of aggravation of recurrence.<br>Standard of Vision. | |
| 4. | **EARS**<br>Hearing must be good in both ears and there should be no sign of suppurative disease. No hearing aid shall be permitted. | |
| 5. | **SKIN**<br>There should be no evidence of acute or chronic skin disease or chronic ulceration. | |
| 6. | **SPEECH**<br>Speech should preferably be without impediment. | |
| 7. | **ALIMENTARY SYSTEM**<br>1. Candidates should have sufficient number of natural teeth (in healthy state) for mastication. | |

| S.No. | Standard of physical fitness | Observations of Medical Officer |
|---|---|---|
| | 2. Spleen should not be palpably enlarged and there should be no evidence of tenderness in the splenic area.<br>3. Liver should not be palpable or tender.<br>4. There should be no oral sepsis.<br>5. There should be no sugar in the urine.<br>6. Candidates should not be suffering from haemorrhoids, fissures in and testis anal hernia or bubonocele or ischio-rectal abscess or hydrocele. | |
| 8 | **CARDIO VASCULAR SYSTEM**<br>1. Blood pressure should not exceed 85 diastolic and 140 systolic.<br>2. Candidates with low blood pressure (i.e. systolic below 100) should be rejected.<br>3. There should be no sign of any cardiovascular disease. | |
| 9 | **RESPIRATORY SYSTEM**<br>Candidates should be free from all diseases of respiratory system. There should be no deformity of chest which may cause impediment to breathing. | |
| 10 | **GENITO URINARY SYSTEM**<br>There should be no evidence of genito urinary disease or any abnormality. | |
| 11 | SKELETAL SYSTEM<br>1. The function of all limbs should be within normal limits.<br>2. There should be no evidence of serious deformity of the spinal column or of the extremities. | |
| 12 | **NERVOUS SYSTEM**<br>There should be no evidence of any disease of nervous system or of any mental disease. | |
| 13 | **GLANDULAR SYSTEM**<br>There should be no evidence of tuberculosis or other disease of the glandular system including the endocrine glands. | |

Above medical fitness certificate should be signed by Government authorized Doctor (Gaz), not below the rank of Assistant Surgeon of Central / State Hospital.

| | |
|---|---|
| **Signature of Medical Officer** | |
| **Name of Medical Officer** | |
| **Registration No.** | |
| **Designation** | |
| **Name of Central/State Govt. Hospital** | |
| **Seal of Medical Officer signing the certificate** | |